सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा



# जलसंधारण विभाग ऑन फील्ड

- प्रत्यक्ष पाहणी करणार; ऑन द स्पॉट रिपोर्ट देणार
- जिल्हा व तालुकास्तरीय समित्यांवर जबाबदारी



### तज्ज्ञ व स्वयंसेवी संस्थांचा सहभाग

जलसंधारण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या दोन तज्ज्ञ व्यक्ती आणि दोन अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी यांचा समित्यांमध्ये निमंत्रित सदस्य म्हणून समावेश करण्याचा प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी होणार असून, स्थानिक गरजांनुसार उपयुक्त मार्गदर्शन मिळण्यास मदत होईल.

### जिल्हास्तरीय समितीची रचना

जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी असतील, तर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सहअध्यक्ष म्हणून कार्य पाहतील. समितीत वन विभागाचे उपवनसंरक्षक, रोहयोचे उपजिल्हाधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषदेतील लघु पाटबंधारे विभागाचे जिल्हा जलसंधारण अधिकारी, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे वरिष्ठ भुवैज्ञानिक, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचा समावेश असेल.मृद व जलसंधारण विभागाचे जिल्हा जलसंधारण अधिकारी सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. विविध विभागांमधील समन्वय साधून जलसंधारणाच्या कामांना गती देणे, नियोजनबध्द अंमलबजावणी करणे हे या समितीचे उद्दिष्ट असेल.

### तालुकास्तरीय समितीची जबाबदारी

तालुकास्तरीय मृद व जलसंधारण समितीच्या अध्यक्षपदी प्रांत अधिकारी असतील. गटविकास अधिकारी सहअध्यक्ष म्हणून कार्यरत राहतील. समितीत उपविभागीय कृषी अधिकारी, तहसीलदार, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषदेचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी, वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनीकरणचे वनपरिक्षेत्र अधिकारी, जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंता, तालुका कृषी अधिकारी सदस्य तर मृद व जलसंधारण विभागाचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी हे सचिव म्हणून काम पाहतील. स्थानिक पातळीवरील कामांची अंमलबजावणी, तपासणी आणि प्रगतीचा अहवाल सादर करणे ही या समितीची मुख्य कर्तव्ये असतील.

### जलसंधारणाच्या उपक्रमांना गती मिळेल

शासनाच्या या निर्णयामुळे जलसंधारणाच्या कामांमध्ये अधिक पारदर्शकता, जबाबदारी आणि कार्यक्षमतेची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रत्यक्ष स्थळ पडताळणीमुळे योजनांच्या गुणवत्तेची खात्री होणार असून, निधीचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. जिल्हा व तालुका स्तरावर समन्वय साधत जलसंधारणाच्या उपक्रमांना नवी गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या जलयुक्त शिवार अभियान २.० तसेच विविध मृदसंधारण आणि जलसंधारण योजनांच्या कामांची आता प्रत्यक्ष स्थळावर जाऊन पडताळणी केली जाणार आहे. योजनांची प्रभावी अंमलबजावणी, काटेकोर संनियंत्रण सुनिश्चित करण्यासाठी शासनाने जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय समित्यांची स्थापना केली. जलसंधारण विभाग ऑन फील्ड जावून ऑन द स्पॉट रिपोर्ट देणार असल्याचे सांगण्यात येते. जलसंधारणासाठी वितरित करण्यात आलेल्या निधीतून आतापर्यंत झालेल्या कामांचा आढावा प्रत्यक्ष स्थळ भेटीद्वारे घेतला जाणार आहे.

कामांची गुणवत्ता, निधीचा योग्य वापर, तसेच स्थानिक पातळीवरील परिणामकारकता तपासली जाईल. यामुळे योजनांमध्ये पारदर्शकता वाढण्यासोबतच भविष्यातील कामांसाठी दिशादर्शन मिळणार आहे. मृद व जलसंधारण विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा व तालुका स्तरावरील संबंधित विभाग आणि यंत्रणांना स्पष्ट जबाबदाऱ्या देण्यात येणार आहेत. प्रत्येक योजनेसाठी उद्दिष्टे निश्चित करून त्यानुसार वेळापत्रक आखले जाईल.

आवश्यकतेनुसार विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येतील.समित्यांकडून वेळोवेळी कार्यवाहीचा आढावा घेण्यात येईल. प्रगती अहवाल वरिष्ठ स्तरावर सादर केला जाईल, ज्यामुळे कामांमध्ये गती आणि शिस्त राखली जाणार आहे. योजनांची अंमलबजावणी ठरलेल्या कालमर्यादेत आणि अपेक्षित गुणवत्तेनुसार व्हावी, यासाठी समित्या सक्रिय भूमिका बजावणार आहेत.

---

## सोलापूर शहरात ड्रोन वापरण्यास बंदी

### आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

सोमवार, दि.१६ फेब्रुवारी मध्यरात्री १२.०१ ते सोमवार, दि.२ मार्च २०२६ या कालावधीत सोलापूर शहरात विना परवाना, बेकायदेशीररित्या ड्रोन वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६३ (१) प्रमाणे कारवाई करण्यात येईल, असे पोलिस आयुक्त एम.राजकुम ार यांनी सांगितले.



सोलापूर शहर हद्दीत ड्रोन किंवा इतर मानवरहित हवाई यंत्र यांचा वापर काही असामाजिक तत्वांकडून करण्यात येण्याची शक्यता आहे त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या स्थळांना धोका निर्माण होऊ शकतो. सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता आहे. या कारणास्तव अशा उपकरणांचा अनियंत्रित वापर टाळण्यासाठी त्वरीत प्रतिबंधात्मक उपायोजना आवश्यक आहेत.

---

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा द्या

### ३० हजार मानधन देण्याचीही मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

अंगणवाडी सेविका व मदतनीसांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा, तो निर्णय होईपर्यंत दरमहा किमान ३० हजार रुपये मानधन देण्यात यावे, अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर योजनाबाह्य कामांचा बोजा टाकू नये, एफआरएस प्रणाली अंतर्गत सुरू असलेले जाचक काम बंद करावे, तसेच केंद्र सरकारने लागू केलेल्या कामगारविरोधी नवीन चार श्रम संहिता रद्द करून जुने कामगार कायदे पुन्हा लागू करावेत, या प्रमुख मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने सोमवारी सोलापूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

चार हुतात्मा पुतळ्यापासून निघालेला हा मोर्चा जोरदार घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचला. जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी झाल्या होत्या. एफआरएस बंद करा, योजनाबाह्य कामे नकोत, शासकीय दर्जा द्या



अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना संघटनेच्या वतीने सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. केंद्र सरकारच्या नवीन चार श्रम संहितेमुळे कायम स्वरूपी रोजगार नष्ट होऊन निश्चित मुदतीच्या रोजगाराला प्राधान्य दिले जात असल्याने कामगारांचे शोषण वाढणार असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण, कामगार हक्कांचे दुर्वलीकरण यासही संघटनेने तीव्र विरोध दर्शविला. संघटनेचे नेते सूर्यमणी गायकवाड याप्रसंगी बोलताना म्हणाले, अंगणवाडी कर्मचाऱ्यांकडून केवळ सेवाभावाच्या नावाखाली प्रचंड काम करून घेतले जात आहे. ग्रॅच्युईटी व मासिक पेन्शन देणे गरजेचे आहे. असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा कायदा, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात प्रोत्साहन भत्त्याचा समावेश करण्यात यावा, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ग्रॅच्युईटी, एफआरएस प्रणाली बंद करणे, स्मार्ट अंगणवाडी केंद्रांची उभारणी करण्यात यावी.

---

## शिवजयंती : १९ फेब्रुवारीला ‘माय भारत’ मेगा पदयात्रा

### व्यापक तयारीचे निर्देश

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १६ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १९ फेब्रुवारी रोजी संपूर्ण राज्यात ‘माय भारत’ (मेरा युवा भारत) अंतर्गत मेगा पदयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे. पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांनी या उपक्रमाचे नियोजन करून तो यशस्वी करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.



विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू यांच्यासह दूरदृश्य प्रणालीद्वारे कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक उपस्थित होते. डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले की, भारत सरकारच्या युवक व क्रीडा मंत्रालय आणि सरकारच्या माध्यमातून शिवजयंतीनिमित्त उपक्रम राबविण्यात येत आहे.

या पदयात्रेचे आयोजन केवळ औपचारिक मिरवणुकीपुरते मर्यादित न राहता ते तरुण पिढीला महाराजांच्या विचारांशी जोडणारे, राष्ट्रप्रेम जागृत करणारे आणि स्वराज्याचा संदेश देणारे प्रेरणादायी अभियान ठरावे, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे. राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी. सी), राष्ट्रीय सेवा योजना भारत स्काऊट आणि गाईड यांसारख्या संघटनांमधील विद्यार्थ्यांना सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहन देण्याच्या सूचना देण्यात आल्या. उन्हाचा त्रास टाळण्यासाठी पदयात्रा सकाळी लवकर आयोजित करावी. मार्गावर आवश्यक त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरोग्य तपासणी केंद्रे, वैद्यकीय पथके आणि पुरेशा रुग्णवाहिका उपलब्ध ठेवाव्यात, असेही निर्देश देण्यात आले.


---

## शाळांची योग्य माहिती न मिळाल्यास पगार थकवणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

खासगी अनुदानित माध्यमिक शाळांसह प्राथमिक शाळांची २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील संचमान्यता अंतिम टप्प्यात आहे. मात्र, माध्यमिक विभागाकडील अडीच हजार आणि खासगी प्राथमिकच्या सुमारे पाचशे शाळांनी अनुदानाचा प्रकार, शाळांचे माध्यम, मंजूर व कार्यरत पदे, पटसंख्या याची माहिती अद्याप दिलेली नाही.

या शाळांना माहिती देण्यासाठी शिक्षण संचालकांनी मुदत दिली आहे. मुदतीत माहिती न दिल्यास मार्चपासून त्या शाळांचा पगार थांबू शकतो; असा सुचना वजा इशारा पुणे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सहसंचालक डॉ. श्रीराम पानझडे यांनी दिला आहे.



२०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील पटसंख्येनुसार प्राथमिक व माध्यमिक शाळांची सध्या संचमान्यता केली जात आहे. १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार संचमान्यतेनंतर पहिल्यांदा अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होईल. त्यानंतर खासगी प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील रिक्त पदांची भरती होईल. त्याचवेळी राज्यातील जिल्हा परिषदांच्या ६५ हजार शाळांमधील शिक्षकांच्या आंतरजिल्हा, जिल्ह्याअंतर्गत बदल्या होतील. १५ जूनपूर्वी या सर्व प्रक्रिया पूर्ण होणार आहेत.

या पार्श्वभूमीवर प्राथमिक व माध्यमिक उच्च माध्यमिक विभागाच्या संचालकांनी सर्व खासगी अनुदानित शाळांमधील पटसंख्या आणि रिक्त- अतिरिक्त शिक्षकांची माहिती मागविली आहे. पण, अद्याप तीन हजार शाळांनी माहिती दिलेली नाही. या आठवड्यात माहिती न दिल्यास त्या शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पगार थांबविला जाणार असून तसा इशारा शिक्षण संचालकांनी दिला आहे.

---

## घरात घुसून महिलेला दिली धमकी; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

एका महिलेच्या घरात घुसून धमकावत अगोदर जसे व्हिडिओ व्हायरल केले तसे अजून वायरल करेल. मी येथे उभारून फाशी घेणार धमकी आरोपीने दिल्याची घटना विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी की, दि. १३ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी वासंती सूर्यकांत येळे वय ५०, रा. ३९ कला संस्कृती, सदिच्छा हाऊसिंग सोसायटी, विजापूर रोड या कॉलेज वरून घरी आले असता, घराचे कुलूप उघडले. लगेच आरोपी स्वप्निल बाबुराव काळे हा मागून वासंती यांच्या घरात घुसून येऊन बसला. मी आता जाऊन पोलीस ठाण्यात हजर होणार आहे. तुम्हाला सर्व काही देतो म्हणून सांगितलं तरी तुम्ही गुन्हा दाखल केला. त्याचा फोन दाखवत वकिलाचा आलेला मेसेज दाखविला, त्यानंतर व्हिडिओ चालू करून बोलण्यास सुरुवात केली.




मला बिल मिळाल्यानंतर अगोदर जसे व्हिडिओ व्हायरल केले तसे अजून वायरल करेल अशी धमकी दिली. मी येथे उभारून फाशी घेणार आहे, त्याचा व्हिडिओ बनवीतो. संपूर्ण घराचा व्हिडिओ काढला. त्यावेळी आरोपीस ढकलून घराबाहेर काढले.

वासंती यांचा आवाज ऐकून समोरील जयश्री चव्हाण बाहेर आल्या, तो ओरडत असताना फिर्यादीने त्यास गेट बाहेर ढकलले व पोलिसांना फोन करून सर्व हकीकत सांगितले व पोलीस ठाण्यात जाऊन अर्ज दिला अशी नोंद विजापूर नाका पोलीस ठाण्यात झाली आहे. पुढील तपास जाधव करीत आहेत.

---

## पीएम किसान हप्ता मिळण्यापासून पावणे दोन लाख शेतकरी राहणार वंचित ?

### आधार लिंक अनिवार्य अन्यथा हप्ता नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

पीएम किसान अर्थात शेतकरी सन्मान निधी योजनेचा २२ वा हप्ता होळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्याची शक्यता आहे. फेब्रुवारीच्या तिसऱ्या अथवा चौथ्या आठवड्यात हा हप्ता जमा होऊ शकतो. मात्र, राज्यातील १ लाख ७२ हजार ३४८ शेतकऱ्यांनी बँक खाती आधारशी लिंक न केल्याने ते या हप्त्यापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ६,१४० शेतकऱ्यांचा समावेश आहे.

कृषी विभागाच्या माहितीनुसार, ६ फेब्रुवारीपर्यंत देशभरातील ३० लाख १८ हजार ३६१ शेतकऱ्यांनी बँक खाती आधारशी लिंक केलेली नाहीत. राज्यनिहाय आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील १,७२,३४८ शेतकऱ्यांची खाती अद्याप आधारशी जोडलेली नाहीत. त्यामुळे या शेतकऱ्यांच्या खात्यात २२वा हप्ता जमा होणार नाही. पीएम किसान योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. ही रक्कम प्रत्येकी २ हजार रुपयांच्या तीन हप्त्यांमध्ये डीबीटीद्वारे थेट बँक खात्यात जमा केली जाते. आतापर्यंत २१ हप्ते वितरित करण्यात आले असून २१वा हप्ता १९ नोव्हेंबर २०२५ रोजी जमा झाला होता. गतवर्षी २८ फेब्रुवारी २०२४ रोजी १६ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला होता. बँक खाते आधारशी लिंक करण्यासाठी शेतकरी ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धत वापरू शकतात. ऑनलाइन पद्धतीत संबंधित बँकेच्या नेटबँकिंग संकेतस्थळावर किंवा मोबाइल ॲपवर लॉग इन करून ‘आधार सीडिंग’ किंवा ‘आधार अपडेट’ पर्याय निवडावा लागतो.




काही बँका युआयडीएआय पोर्टलद्वारेही ही सुविधा देतात. ऑफलाइन पध्दतीत जवळच्या बँक शाखेला भेट देऊन आधार कार्ड आणि पासबुक सादर करून आधार लिंकिंग फॉर्म भरावा लागतो. काही बँका एसएमएस किंवा एटीएमद्वारेही ही सुविधा देतात. लिंकिंग पूर्ण झाल्यानंतर बँकेकडून पुष्टीकरण संदेश दिला जातो.

### ५ लाख २० हजार शेतकऱ्यांना मिळाला हप्ता

सोलापूर जिल्ह्यातील एकूण ५,२०,०११ शेतकऱ्यांना यापूर्वी हप्ता मिळाला आहे. त्यापैकी ५,१९,२५२ शेतकरी आधार प्रमाणित आहेत. ५,१३,१७० बँक खाती आधारशी लिंक असून ६,१४० खाती अद्याप लिंक नाहीत. २८ प्रकरणांचे प्रमाणीकरण प्रलंबित आहे.

### ऑफलाइन पध्दत

▸ जवळच्या बँक शाखेला भेट द्या. ▸ आधार कार्ड व पासबुक/खाते तपशील सादर करा. ▸ आधार लिंकिंगचा फॉर्म भरून जमा करा. ▸ काही बँका एसएमएस किंवा एटीएमद्वारेही सुविधा देतात. ▸ लिंकिंग पूर्ण झाल्यानंतर बँकेकडून पुष्टीकरण संदेश प्राप्त होतो.

कृषी विभागाच्या माहितीनुसार, ६ फेब्रुवारीपर्यंत देशभरातील ३० लाख १८ हजार ३६१ शेतकऱ्यांनी बँक खाती आधारशी लिंक केलेली नाहीत. राज्यनिहाय यादीनुसार महाराष्ट्रात १,७२,३४८ शेतकऱ्यांची खाती अद्याप आधारशी जोडलेली नाहीत. परिणामी, या शेतकऱ्यांच्या खात्यात २२वा हप्ता जमा होणार नाही.

---




## माता प्रतिष्ठानची शिवजयंती मिरवणूक उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

शिवजयंतीनिमित्त माता प्रतिष्ठानतर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १३ फुटी मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक गणेश वानकर, मृण्ययी गवळी, सोनाली गायकवाड यांच्या हस्ते शिवरायांची आरती करुन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.

संस्थापक महेश मुदलियार, उत्सव अध्यक्ष सोमनाथ मस्के यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी संभाजी आरमारचे श्रीकांत डांगे, नगरसेवक शिवाजी वाघमोडे, मुन्ना वानकर, दत्तात्रय वानकर, लहू गायकवाड, चंद्रकांत पवार, महादेव गवळी, श्याम गांगर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दमाणी नगर येथील पावन गणपती मंदिरापासून मिरवणुकीस प्रारंभ तर थोबडे वस्ती येथे समारोप करण्यात आला. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला, लेझीम पथक, धनगरी ढोल, मल्लखांब, दांडपट्टा या मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले.

पद्मिनी शेट्टियार, कविता मस्के, रेखा मस्के, शोभा मस्के, लक्ष्मी नागने, पद्मिनी गायकवाड,राणी जाधव, रेश्मा नरळे, दमयंती भुसे यांच्यासह परिसरातील महिला मोठ्या संख्येने पारंपारिक वेशभुषेत सहभागी झाल्या होत्या. मिरवणूक पाहण्यासाठी नागरिकांनी दुतर्फा गर्दी केली होती.

मिरवणुकीच्या यशस्वीतेसाठी अरुण अवताडे, भाऊ म्हस्के, संजय डोके, सुनील पुकाळे, संजय मस्के, आबा जाधव, तानाजी जाधव, गणेश भुसे, विकास पवार, उमेश मुदलियार, प्रमोद अवताडे गोविंदा नागणे, दत्तात्रय गुंड, निलेश नलवडे, शंभूराजे गायकवाड, नागेश मस्के, रितेश मस्के, सूर्या शटयार, सचिन पुकाळे यांनी परिश्रम घेतले.

## ज्ञानामृत आनंदलहरी १३५८

**नाना सूर्य प्रकाशें । प्रकटी तैं अभ्र भासे ।**
**तो लोपला हें ही दिसे । सर्योचि कीं ।।**

आपण आणि माया या दोहांच्या पुढाकाराने हे चराचर निर्माण झाले असले तरी हे चराचर व आपण वेगळे नसुन एकच असल्याचे भगवंत सांगत आहेत. लोक स्वार्थामुळे मला या जीवमात्रापासुन वेगळे मानतात. जीवमात्रांची सेवा न करता माझी पुजा करतात. माझ्यासाठी देऊळ, देव्हारे बांधतात आणि जीवमात्राकडे मात्र दुर्लक्ष करतात. माझ्यात आणि जीवमात्रात भेद नसतानाही भेदात्मक दृष्टीने ते मला व जीवात्म्याला पाहतात. सोने अलंकार रूपाला आले म्हणुन सोन्याचे सुवर्णपण जात नाही. कमळ उमलले म्हणुन ते कमळपणाला मुकत नाही. तसे आम्ही चराचररूपाने प्रकटलो म्हणून आम्ही व चराचर भिन्न नाहीत, हे विसरू नये.



पेरलेला ज्वारीचा दाणा ताटाच्या रूपाने वाढून कणसाच्या रूपाने वेगळा झाल्यासारखा वाटतो. पेरलेला पहिला दाणा नष्ट होवुन कणसाच्या रूपाने दुसरा दाणा आला, असे समजण्यापेक्षा पेरलेला दाणाच कणसाच्या रूपाने दिसतो असे म्हणने योग्य असते. मुळात दाणाच पेरला नसता तर कणीस कोठुन आले असते? त्याप्रमाणे मला या जर जिवापासुन भिन्न न मानता, माझ्यात आणि या भुतमात्रात भिन्नत्व न पाहता एकरूपच पहावे. गुणत्रयाच्या बंधामुळे मीच स्वत:ला निरनिराळ्या शरीरात निरनिराळा भासवीत असतो. हे अर्जुना तुझ्या लक्षात असु दे. पांढरी वस्तु पिवळी दिसली म्हणजे आपण आपणाला कावीळ झाल्याचे मानतो. पांढरी वस्तु पिवळी दिसण्याचे ज्ञान आपणाला डोळ्यांनीच दिले व वस्तु पिवळी दाखविण्याचे कामही डोळ्यांनीच केले. मुळात पांढरी वस्तु पिवळी दाखविणारे व वस्तु पिवळी दिसत असल्याचे ज्ञान देणारे डोळे कांही भिन्न नसतात. त्याप्रमाणे आपण हे सर्व जड जीव निर्माण करीत असलो तरी या निर्माण झालेल्या चराचरापासुन आपण भिन्न नाहीत. सूर्यप्रकाश प्रकट झाला म्हणजे ढग दिसतात.त्या ढगामुळे जर सुर्य ढगाआड गेला तर, तो ढगाआड गेल्याचेही त्याचाच प्रकाशामुळे दिसते. त्याप्रमाणे माझे आहे. असे सांगतांना भगवंत म्हणाले,

**नाना सूर्य प्रकाशें । प्रकटी तैं अभ्र भासे ।**
**तो लोपला हें ही दिसे । सर्योचि कीं ।।**

आपल्यापासुन उत्पन्न झालेल्या सावलीला आपण घाबरण्याचे कारण नाही. कारण ती आपल्यापासुन उत्पन्न झालेली असते. ती आपल्यापेक्षा वेगळी नसते. त्याप्रमाणे मी वेगवेगळी शरीरे निर्माण केली असली तरीही ती आपणापासूनच निर्माण झाली असल्याने त्यांच्यात व माझ्यात भिन्नत्व पाहू नये. भगवंताचा अर्जुनाला होत असलेला हा समत्वाचा उपदेश अत्यंत महत्वाचा आहे. आपल्या देशाला या उपदेशाची फार गरज आहे. कारण आपण पावलो पावली भिन्नत्व निर्माण केले आहे. भिन्नत्वाचे किती प्रकार आपण निर्माण केले, असे विचारले तर त्याचे उत्तर अगणित असे असणार आहे. भिन्नत्व निर्माण करणारे आपणच असल्याने, हे भिन्नत्व नष्ट करून समत्व पाहण्याचे कामही आपणलाच करावे लागणार आहे. या शुभ कार्यासाठी वेगळ्या मुहूर्ताची वाट न पाहता, याचा शुभारंभ आजपासुनच करू या आणि लहान मोठा, गरीब श्रीमंत अशा प्रकारचा भेद कायमचा मिटवू या. आपले असे कार्य ही एक प्रकारची भगवंत भक्तीच होय. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६
विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - माघ अमावस्या
ऋतु - हेमंत ।
नक्षत्र- धनिष्ठा (२१.१५)
योग - परिघ (२४.२८)
करण - किंस्तुघ्न (२९.१७)
राहू काल : मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०

दिनविशेष : दर्श अमावस्या.
१९२७: भारत आणि युनायटेड किंगडम दरम्यान टेलिफोन सेवा सुरू झाली.
१९९६: गॅरी कास्पारोव्हने 'डीप ब्ल्यू' या सुपर कॉम्प्युटरचा चेस स्पर्धेत पराभव केला.
२००८: कोसोव्होने सर्बियापासून स्वतंत्र झाल्याची घोषणा केली.
२०२५-२०२६: आग्रा येथे दरवर्षी १७ ते २७ फेब्रुवारी दरम्यान ताज महोत्सव साजरा केला जातो.

# दुबई-सोलापूर औद्योगिक मैत्रीचे नवे पर्व

### आ. देशमुख; कन्सिस्टंट इंजिनिअरिंग कन्सल्टंट्सच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

दुबई आणि सोलापूर यांच्यात औद्योगिक मैत्रीचे नवे नाते सुरू झाले असून, सोलापूर जिल्हा समृद्ध व्हावा यासाठी उद्योग, गुंतवणूक आणि रोजगारवाढीचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत, असे प्रतिपादन आमदार सुभाष देशमुख यांनी केले. सोलापूरच्या गारमेंट उद्योगासह इतर स्थानिक उत्पादनांचे जागतिक स्तरावर मार्केटिंग व्हावे यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



जुळे सोलापूर येथील साईवेद डिव्हाईन, दुसरा मजला, शिवदारे कॉलेजजवळ, विशाल नगर येथे शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी कन्सिस्टंट इंजिनिअरिंग कन्सल्टंट्स प्रा. लि. या कंपनीच्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार देशमुख होते. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांची होते.

दुबई (संयुक्त अरब अमिराती) येथे २००७ साली स्थापन झालेली Consistent ही Construction क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाची Engineering कन्सल्टन्सी कंपनी आता सोलापूरमध्ये आपले कार्य सुरू करत आहे. बिल्डिंग इंजिनिअरिंग व सस्टेनेबिलिटी क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवलेल्या या कंपनीच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाला नवी दिशा मिळणार आहे.

आखाती देशांमध्ये प्रत्येक वर्षी सर्वोत्कृष्ट २० इंजिनिअरिंग कंपन्यांची सूची प्रसिद्ध केली जाते, त्यामध्ये डेपीळींशपीं एपसळपशशीळपस गेली ५ वर्ष सलग त्यांचे स्थान यादीमध्ये उंचावत आहे. आणि अभिमानाची गोष्ट म्हणजे Consistent Engineering ही त्या सूचीतील एकमेव भारतीय कंपनी आहे.



## सनातन संस्थेच्या वतीने महाशिवरात्री निमित्त ग्रंथ प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

महाशिवरात्रीनिमित्त सनातन संस्थेच्या वतीने सोलापूर शहरात विविध ठिकाणी सात्विक उत्पादने व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. अक्कलकोट रस्त्यावरील विरतपस्वी प्रशाला, कन्ना चौकातील श्री. रेवणसिद्धेश्वर मंदिर, चौपाड येथील श्री मल्लिकार्जुन मंदिर यांसह एकूण १६ ठिकाणी प्रदर्शन लावण्यात आले होते. सोलापूरकरांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. आमदार विजयकुमार देशमुख, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. याठिकाणी धर्मशिक्षण, बालसंस्कार, साधना, हिंदुत्व, आयुर्वेद, राष्ट्ररक्षण इत्यादी विषयांचे ग्रंथ प्रदर्शित करण्यात आले आहेत. सात्विक जीवनशैली यांविषयी मार्गदर्शन करणारे ग्रंथ व उत्पादने ठेवण्यात आली होती. महाशिवरात्रीच्या निमित्ताने अध्यात्मिक वातावरण अनुभवण्याची संधी भाविकांना मिळाली.

## रणदिवेवाडी येथील महादेव मंदिरात महाशिवरात्री साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १६ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील रणदिवेवाडी येथे महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भाविक भक्तांची मोठी गर्दी पाहावयास मिळाली. त्या ठिकाणी मोठ्या उत्साहात शिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यात आला.



गेल्या २५ वर्षापासून या मंदिरात गावकऱ्यांच्या वतीने महाशिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यात येतो.लोकवर्गणीतून या मंदिराची उभारणी केले असून या मंदिराचे सभामंडप माढा तालुक्याचे तत्कालीन आमदार बबनराव शिंदे यांच्या निधीतून उभारण्यात आला आहे. रविवारी महाशिवरात्रीच्या दिवशी अबाल वृद्ध व स्त्री पुरुष भाविक भक्ताने मोठी गर्दी करून शंभू महादेवाचे दर्शन घेतले. या निमित्ताने मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन देखील करण्यात आले होते. सोमवारी काल्याच्या दिवशी गावकऱ्यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शेकडो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. या ठिकाणी दोन दिवस झालेल्या धार्मिक कार्यक्रमाने मंदिर व परिसरातील वातावरण भक्तीमुळे झाले होते.

## 'सिंहगड'मध्ये 'लाईफ इज ऑल पॉझिटिव्ह' विषयी मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय एक दिवसीय 'लाईफ इज ऑल पॉझिटिव्ह' या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन सत्र उत्साहात पार पडले. प्रमुख वक्ते म्हणून डीक परास्सिनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



मुक्त प्रश्नोत्तर पद्धतीने झालेल्या या सत्रांत शिक्षण, करिअर, आत्म विश्वास, ताणतणाव, नातेसंबंध आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यावर डीक परास्सिनी यांनी सोप्या शब्दांत सकारात्मक दृष्टीकोनातून मार्गदर्शन करत जीवनात नकारात्मकतेला स्थान न देण्याचा संदेश दिला.

देशातील विविध नामांकित शैक्षणिक संस्था व शासकीय यंत्रणांमध्ये मार्गदर्शन केलेल्या परास्सिनी यांनी 'लाईफ इज ऑल पॉझिटिव्ह' या सामाजिक उपक्रमातून आजवर हजारो लोकांपर्यंत सकारात्मक विचार पोहोचवला आहे. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून सत्रामुळे विद्यार्थ्यांना नवी ऊर्जा व प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. वक्त्यांनी समर्पक उत्तरे देत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली. डीक परास्सिनी यांनी यापूर्वी देशातील नामांकित अभियांत्रिकी संस्था, वैद्यकीय विद्यापीठे तसेच राष्ट्रीय स्तरावरील शासकीय यंत्रणांमध्ये मार्गदर्शन केले आहे. 'लाइफ इज ऑल पॉझिटिव्ह' या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी आजवर ६३ हजारांहून अधिक लोकांवर सकारात्मक प्रभाव टाकला असून १५ हजारांहून अधिक अन्नसेवा आणि १२ हजारांहून अधिक वृक्षारोपण उपक्रम राबवले आहेत. सूत्रसंचालन एम. के. जाधव यांनी केले, तर आभार डॉ. एस. डी. नवले यांनी मानले.



## प्रार्थना योग मंडळाच्या वतीने सामूहिक ईष्टलिंग पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

महाशिवरात्रीनिमित्त आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळ यांच्या वतीने योग विहार येथे सामूहिक ईष्टलिंग पूजनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे यंदाचे २३ वे वर्ष आहे. सिध्देश्वर देवस्थान येथील श्री पंचाक्षरी स्वामी यांच्या नेतृत्वाखाली शास्त्रोक्त पध्दतीने ईष्टलिंग पूजनाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी शिवयोगाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी नीळकंठप्पा कोनापुरे, बाबासाहेब कुलकर्णी, विश्वनाथ म्हेत्रे, संतोष मंठाळकर, चनबसप्पा अलमेल, दयानंद माशाळकर, सुभाष मुंडेवाडीकर, राजू कुंभार, शिवलीला स्वामी, हिराबाई कुंभार आदी उपस्थित होते.

# ईच्छा भगवंताची परिवारातर्फे सुगंधी दुधाचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

महाशिवरात्री निमित्त ईच्छा भगवंताची परिवार यांच्या वतीने भाविकांसाठी मसाला दुधाचे वाटप करण्यात आले. परिवाराचे संस्थापक, मार्गदर्शक व आधारस्तंभ लक्ष्मण जाधव यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर रेल्वे स्थानकासमोर तसेच शहरातील विविध ठिकाणी हा उपक्रम पार पडला.




गेल्या ४० वर्षांपासून लक्ष्मण मामा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक नागेश गायकवाड, ॲड. अनिल जाधव, शिवाजी गायकवाड आणि ईच्छा भगवंताची परिवाराची ही अखंड सेवा साक्षात शिवशंभोच्या नावाने सुरु असल्याचे नगरसेवक किसन जाधव यांनी सांगितले. यंदा तब्बल ७५१ लिटर सुगंधी आणि पौष्टिक दुधाचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी पंडित शेटे, अमोल लकडे, सिद्धाराम खजूरगी अध्यक्ष, शरण मठ, नीलम नगर, शिवा बंडगर, अल्ताफ शेख, चेतन नागेश अण्णा गायकवाड, हरीश तेलगू, निलेश कांबळे, विनोद गायकवाड, ॲड. किरण गायकवाड, कार्तिक जाधव, तन्मेष गायकवाड, तेजस गायकवाड, अजिंक्य जाधव, आदेश जाधव, उमेश जाधव, सागर कांबळे, अमोल जगताप, प्रथमेश पवार, वसंत कांबळे, महादेव राठोड, आकाश जाधव, संकल्प जगदाळे, ऋषी येवले, गणेश यालगी, संतोष हुडको, सचिन आंगडीकर उपस्थित होते.



## आस्था संस्थेतर्फे गरजूंना फराळाचे वाटप

**सोलापूर, १६ फेब्रुवारी-**

आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने महाशिवरात्री दिनानिमित्त २५० गरिब, वंचित, बेघर, निराधार अपंग यांना सामाजिक संस्थेच्या वतीने उपवास निमित्ताने शाबु खिचडी, शेंगा लाडू, बटाटा चिवडा, वेफर्स, राजगिरी लाडू, ताक, केळी इत्यादीचा वाटप करण्यात आले.

याप्रसंगी नगरसेवक अनंत जाधव, विनायक विटकर, गौतम कसबे तसेच मांगोबा मंदिराचे पुजारी अमोल पाटील, आस्था सामाजिक संस्था अध्यक्ष आनंद तालिकोटी, सचिव शिवानंद सावळगी, संचालक योगेश कुंदुर, समाजसेवक गणेश कोरे, उद्योगपती सुशीलकुमार व्यास, पंकज पाटील यांच्या हस्ते फराळाचे वाटप करण्यात आले. या फराळ वाटपासाठी शहरातील दानशूर व्यक्ती श्राविका संस्थेच्या विश्वस्त अंजली शहा, माजी सहाय्यक पोलीस आयुक्त दिपक अर्वे, उद्योगपती सुशीलकुमार व्यास, अनिता पाटील, कांचन आगवणे यांनी आर्थिक स्वरूपात सहकार्य केले. याप्रसंगी सुहास छंचुरे, वेदांत तालिकोटी, महेश नागणसुरे, सुरज छंचुरे,उदय छंचुरे, गिरीश विजापुरे, नितीन भांडेकर, दशरथ इरकल यांनी परिश्रम घेतले.

## एमआयटी विश्वप्रयागमध्ये राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण, मॉडेल मेकिंग स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये स्कूल ऑफ फार्मसीतर्फे 'डिप्लोमा इन फार्मसी' (डी. फार्मसी) च्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण व मॉडेल मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

औषधनिर्माण शास्त्रातील उदयोन्मुख विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, नाविन्यपूर्ण विचारसरणी आणि प्रभावी वैज्ञानिक संवादकौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन मुंबईतील एआयओसीडी फार्मा लि. चे संचालक बसवराज मनुरे यांच्या हस्ते करण्यात आले.या स्पर्धेत एकूण ५२ पोस्टर्स आणि १९ मॉडेल्स सादर करण्यात आले, तर १४० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. इतर संस्थांमधील प्राध्यापकांनीही यावेळी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना अशा स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, आत्मविश्वास आणि प्रभावी सादरीकरण कौशल्ये विकसित होतात. शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक असलेली संवादकौशल्ये आणि संशोधनाभिमुख दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे बसवराज मनुरे यांनी केले. अशा उपक्रमांमुळे एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातील अनुभवाधारित अध्यापन, नवोन्मेषी दृष्टीकोन आणि परिणामाभिमुख शिक्षणपद्धती अधोरेखित होते असे मत स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता प्रा. अजीत कुलकर्णी यांनी व्यक्त केले. त्यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर समारोप आयक्यूएसी संचालक प्रा. रविराज कुलकर्णी यांनी केला.




## ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

मराठी भाषा ही आपली मातृभाषा असून तिचे जतन संवर्धन व प्रसार करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. या उद्देशाने विजापूर रोड सैफुल जवळील ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम व काव्यवाचन आयोजित करण्यात आले होते .

कार्यक्रमाची सुरुवात 'मराठी भाषेचे महत्त्व' या विषयाच्या प्रास्ताविक भाषणाने करण्यात आली. मराठी भाषेचा इतिहास, तिची समृद्ध परंपरा, संत साहित्य, आधुनिक साहित्य व आजच्या डिजिटल युगातील मराठी भाषेचे ज्ञान यावर प्रकाश टाकण्यात आला. काव्यवाचनात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व आपल्या मराठी भाषेवरील प्रभुत्व सादर केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमास संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य एस. के. मोहिते यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संयोजन ग्रंथपाल एस. व्ही. कस्तुरे यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी साक्षी उप्पीन व राधिका पुजारी यांनी केले. प्रा. एल. एस. बिराजदार यांनी आभार मानले.

## गुरु रविदास मध्यवर्ती जयंतीनिमित्त पालकमंत्री गोरे यांनी केली महाआरती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

श्री गुरु रविदास विश्व महापीठ भारत शहर जिल्हा शाखा अशोक लांबतुरे प्रतिष्ठान संचलित गुरु रविदास मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या मूर्तीची सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.



अध्यक्षस्थानी हातकंणगलेचे आमदार व अनुसूचित जाती कल्याण समिती महाराष्ट्र शासनाचे सदस्य अशोकराव माने होते. महापौर विनायक कोंड्याल आमदार देवेंद्र कोठे शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर मनपा सभागृह नेता नरेंद्र काळे उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर नगरसेविका संगीता जाधव, श्रीदेवी फुलारे, सुमन चाबुकस्वार नगरसेवक गणेश वानकर, चैत्राली शिवराज गायकवाड, श्याम पाटील, नगरसेविका मंजिरी संकेत किल्लेदार नगरसेवक राजकुमार पाटील, शुभम आगवणे खर्डी गन, आबा आगावणे, अंबिका गायकवाड, सुरेखा लांबतुरे जयंती उत्सव अध्यक्ष रवी व्हनकोळे कार्याध्यक्ष कृष्णा काळे सचिव अविनाश चाबुकस्वार सहसचिव संतोष कबाडे खजिनदार राम गायकवाड उपाध्यक्ष विष्णू राऊत, राहुल कोरे, सचिन कांबळे, इस्माईल बनसोडे, बाळासाहेब राऊत, मधुकर गवळी किरण ननवरे,सोमनाथ कांबळे, रविकांत कांबळे, छायाप्पा चव्हाण, बाळकृष्ण सोनवणे, परशुराम कानडे, महेश रगटे, दयानंद इरवाडकर, प्रवीण इरकशेट्टी, तुकाराम चाबुकस्वार, पंकज लांबतुरे, अमोल साळे, किरण व्हनकोरे, अरुण शिंदे, दत्ता राजगुरू, जगदेवी रकटे अलका गवळी आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य महापालिका नगरसेवक व नगरसेविका यांचा व समाजातील नावीन्यपूर्ण काम करणारे, पारंपारिक व्यवसाय सोडून इतर व्यवसायात उत्तुंग भरारी घेणारे सन्मानीय व्यक्ती सिद्धाराम चाबुकस्वार, विजयेंद्र शिखरे, कटकधोंड, जयश्री लांबतुरे यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक सुरेखा लांबतुरे यांनी केले व आभार आकाश जाधव यांनी मानले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### करकंब येथील महादेव मंदिरात महाशिवरात्री साजरी



**करकंब, दि. १६ फेब्रुवारी-**
श्री शिवांच्या सन्मानार्थ महाशिवरात्री हा सण साजरा केला जातो.श्री शिव आणि श्री पार्वतीच्या लग्नाचे स्मरण व्हावे यासाठी हा सण साजरा करतात. हा सण म्हणजे जीवनात व जगामध्ये अंधार आणि अज्ञानावर मात करण्याचे स्मरण आहे. त्या अनुषंगानेच करकंब ता.पंढरपूर येथील माळी गल्लीतील महादेव मंदिरामध्ये महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन माळी गल्लीतील समस्त शिवभक्तांनी केले होते.यावेळी मंदिराच्या गाभार्यातील दोन फूट उंचीच्या शिवलिंगास जलाने अभिषेक करण्यात आला. हे दोन फूट उंचीचे शिवलिंग २तास पाण्यात ठेवून जलाने अभिषेक करण्यात आला.महाशिवरात्रीच्या निमित्ताने रात्रभर प्रथमतः भजन व नंतर शिवांच्या लीलांचे वर्णन करणारी,शिवभक्तीचे महत्त्व,शिवांच्या कथा व महिमा सांगणाऱ्या शिवलीलामृत ग्रंथाचे पारायण करण्यात आले. महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी माळी गल्लीतील समस्त शिवभक्तांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.हा उत्सव यशस्वीपणे साजरा करण्यासाठी माळी गल्लीतील सर्व शिवभक्तांनी परिश्रम घेतले.



### महाशिवरात्री निमित्त श्री विठ्ठलाची पूजा

**पंढरपूर, दि.१६ फेब्रुवारी-**
महाशिवरात्री निमित्त दिनांक १५ फेब्रुवारी रोजी रात्रौ १२ वाजता श्री विठ्ठलाच्या मस्तकावर शिवलिंग असल्याने त्याची षोडशोपचार पूजा विधीवत करण्यात आली. सदरची पूजा मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते संपन्न झाली. या पूजेसाठी होळकर संस्थानतर्फे काशी येथून पवित्र गंगाजल उपलब्ध करून देण्यात आले होते. या पवित्र पूजेच्या वेळी मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, हभप ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार, सहाय्यक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी उपस्थित होते.




### प्रा. अनिल बाबर यांना पीएचडी पदवी प्रदान

**पंढरपूर, दि. १६ फेब्रुवारी-**
श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या महाविद्यालयातील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे विभाग प्रमुख प्रा. अनिल बाबर यांना विश्वेश्वरय्या तंत्रशास्त्र विद्यापीठ, बेळगाव यांच्यातर्फे नुकतीच पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. व्हर्मी कंपोस्टिंग ऑफ शुगर केन ट्रैश अँड इट्स एप्लीकेशन इन डिग्रेडेशन ऑफ इमर्जिंग पोल्युटेंट्स इन सॉईल या विषयांमध्ये त्यांनी संशोधन पूर्ण केले. यासाठी त्यांना प्रा. डॉ. एन.एस. पाटील व डॉ. संजीव संगमी यांचे मार्गदर्शन लाभले या यशाबद्दल श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी डॉ. अनिल बाबर यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस पी पाटील यांच्या हस्ते डॉ. अनिल बाबर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार जी. डी. वाळके, उपप्राचार्य जे. एल. मुडेगावकर, डॉ. अमोल अडमुठे, संशोधन अधिष्ठाता डॉ.अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. राहुल पांचाळ, विभागप्रमुख डॉ. एस. एम. लंबे, डॉ. एस. व्ही. एकलारकर, प्रा. दीपक भोसले यांनी डॉ. अनिल बाबर यांचे अभिनंदन केले.

### केशरी कार्ड धारकांना मोफत धान्य द्या; तहसीलदाराना निवेदन

**अक्कलकोट, दि. १६ फेब्रुवारी-**
अक्कलकोट तालुक्यातील सर्व केशरी कार्ड धारकांना अन्न सुरक्षा योजने अंतर्गत मोफत धान्याचा पुरवठा करावा, अशा मागणीचे लेखी निवेदन स्वराज्य माहिती अधिकार संघटनेच्या वतीने अक्कलकोट चे तहसीलदार विनायक मगर यांना देण्यात आले. स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष दिपक कांबळे, संस्थापक तथा राष्ट्रीय मुख्य महासचिव कमलेश शेवाळे, विश्वस्त तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष धनश्री उत्पात यांचे सूचनेनुसार अक्कलकोट तहसील कार्यालयात तहसीलदार विनायक मगर यांना मागणीचे निवेदन जिल्ह्या अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. याप्रसंगी अक्कलकोट शहर अध्यक्ष श्रीमती मिराबाई बुद्रुक, सदस्य किशोर बुद्रुक उपस्थित होते.

### ॲमेझॉन प्राइमने ग्राहकांसाठी जलद डिलीव्हरी दिली

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**
ॲमेझॉनने आज जाहीर केलं की, २०२५ हे प्राइम सदस्यांसाठी आतापर्यंतचं सर्वात जलद डिलिव्हरीचं वर्ष ठरलं, ज्यामध्ये ५५ कोटींपेक्षा अधिक उत्पादने त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी पोहोचवली गेली. यामध्ये मागील वर्षीच्या तुलनेत ४० टक्के वाढ नोंदवली गेली. प्राइम सदस्यांपैकी सर्वोत्तम १० टक्के सदस्यांनी त्यांच्या प्राइम मेंबरशिपच्या खर्चाच्या आठपटाहून अधिक बचत केली असून, भारतातील प्राइम ग्राहकांना मोफत व जलद डिलिव्हरीसोबतच अनेक रिवॉर्ड्स, खास डील्स, ऑफर्स आणि कॅशबॅक्सद्वारे ॲमेझॉन डॉट इन खरेदी करताना अधिक बचत करण्यात मदत करत आहे. अभिनव अग्रवाल म्हणाले की, शेवटच्या क्षणी लागणारी गरजेची वस्तू असो, आधीच नियोजित खरेदी असो किंवा संपूर्ण कुटुंब एकत्र पाहू शकेल असं मनोरंजन असो - प्राइम वेग, अतुलनीय मूल्य आणि सोयीसाठीच तयार करण्यात आले आहे.

# किर्तनकाराचा सख्ख्या भावानेच केला खून

## वैद्यकीय क्षेत्रातील हलगर्जीपणामुळे हभप महाराजांचा ३० तासानंतर अंत्यविधी

**आरोपीला अटक; पाच दिवसांची पोलिस कोठडी**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१६ फेब्रुवारी-**
जाखले (ता.माढा) येथील गायकवाड वस्ती परिसरात शेतीच्या वादातून सख्ख्या भावानेच किर्तनकार भावावर लोखंडी घन व दगडाने प्राणघातक हल्ला करून खून केल्याची धक्कादायक घटना दि.१४ फेब्रुवारी रोजी घडली. या घटनेत ह.भ.प. हनुमंत रघुनाथ गायकवाड (वय-६८) यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात रात्री उशिरा सुमारे ११ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला असून, खून करून फरार झालेला आरोपी उत्तरेश्वर रघुनाथ गायकवाड (वय ५४, रा. जाखले) याला टेंभुर्णी पोलिसांनी २४ तासांत अटक केली. आरोपीला माढा न्यायालयात हजर केले असता तपासासाठी २० फेब्रुवारीपर्यंत ५ दिवसांची पोलीस कोठडी मंजूर करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी दिली.

टेंभुर्णी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या गुन्ह्यातील फिर्यादी वामन धोंडीबा पवार (वय ७०, व्यवसाय-सेवानिवृत्त शिक्षक, रा. चौभेपिंपरी, ता. माढा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील मयत ह.भ.प. हनुमंत रघुनाथ गायकवाड महाराज हे जाखले परिसरात कीर्तनकार म्हणून परिचित होते. त्यांना दोन भाऊ व दोन मुले असा परिवार असून ते जाखले परिसरातील दत्त मंदिराचे सेवक म्हणूनही ओळखले जात. दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २.३० ते ३ या वेळेत मौजे जाखले येथील जमीन गट नं. ७९/१ मधील नवनाथ गायकवाड यांच्या गुरांच्या गोठ्यात ही खूनाची घटना घडली. शेतीमध्ये खड्डा खोदण्यासाठी आलेला जेसीबी माघारी का लावला, या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. त्यात आरोपी उत्तरेश्वर गायकवाड याने दगड फोडण्याचा लोखंडी घन व दगडाचा वापर करून आपल्या सख्ख्या भावाच्या डोक्यावर, छातीवर व पाठीवर जोरदार वार केले. गंभीर मार लागल्याने ह.भ.प. हनुमंत गायकवाड महाराज हे रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळले.

गंभीर जखमी अवस्थेत त्यांना नातेवाईकांनी तातडीने टेंभुर्णी येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. घटनेनंतर आरोपी उत्तरेश्वर गायकवाड फरार झाला होता. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीच्या शोधासाठी टेंभुर्णी पोलीस ठाण्याकडून दोन पथके तयार करण्यात आली. सपोनि. गणेश चौधरी, पोलीस उपनिरीक्षक अजित मोरे, हवालदार संदीप गिरमकर, विलास नलवडे, पोलीस कॉन्स्टेबल मोहन तळेकर व सुरज मुलानी यांनी शोधमोहीम राबवली. शोध घेत असताना आरोपी जाखले हद्दीत पहाटे मिळून आल्याने टेंभुर्णी पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले.

आरोपीला रविवार दि. १५ फेब्रुवारी रोजी माढा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी तपासकामी पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली असता न्यायालयाने आरोपीला दि. २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत ५ दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरिक्षक गणेश चौधरी करीत असून अधिक तपास सुरू आहे.

यानंतर मृतदेह पहाटे सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी नेण्यात आला. मात्र तेथेही प्रक्रिया पूर्ण होण्यास दुपारी तीन वाजले. परिणामी मृत्यू झाल्यानंतर अंदाजे २४ ते २६ तासांनी पोस्टमार्टम झाल्याने जाखले परिसरातील नागरिक व नातेवाईकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या प्रकारामुळे नातेवाईकांना मृतदेह ताब्यात मिळण्यासाठी तब्बल २४ तास प्रतीक्षा करावी लागली. सोलापूरहून मृतदेह ताब्यात घेऊन सुमारे १२५ किलोमीटरचा प्रवास करून रात्री साडेसातच्या सुमारास अंत्यविधी करण्यात आला. यामध्ये तीस तास मयत ताब्यात घेऊन गावात येईपर्यंत वेळ गेला त्यामुळे माढा तालुक्यातील टेंभुर्णी आरोग्य व्यवस्थेतील हलगर्जीपणाकडे लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष द्यावे, तसेच तालुक्यातच कुर्डूवाडी येथे पोस्टमार्टमची सुविधा तत्काळ उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून करण्यात येत आहे.

**पोस्टमार्टमला विलंब; नागरिकांत संताप**

जाखले येथील घटना दुपारी घडूनही गुन्हा दाखल होण्यास रात्री उशिरापर्यंत विलंब लागल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. मृतदेह पोस्टमार्टमसाठी टेंभुर्णी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणला असता, संध्याकाळची वेळ झाल्याचे कारण देत संबंधित डॉक्टरांनी तत्काळ शवविच्छेदन (पोस्टमार्टम) करण्यास नकार दिल्याचे सांगण्यात आले.

## तिल्हेहाळ येथे महाशिवरात्री उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**
तिल्हेहाळ (ता. दक्षिण सोलापूर) येथील जागृत महादेव मंदिरात महाशिवरात्री उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

मन्नुसिंग रजपूत यांच्या संकल्पनेतून ग्राम स्थांच्या सहकार्याने साकारलेल्या महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त पहाटेपासून होमहवन, अभिषेक आणि महाआरती करण्यात आली. त्यानंतर दिवसभर फराळ व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हनुमान मंडळ (तिल्हेहाळ), हनुमान मंडळ (आलेगांव), हनुमान महिला मंडळ (दमाणी नगर, सोलापूर), हनुमान मंडळ (हिपळे), रेवणसिध्द मंडळ (औज) यांच्या भजनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला.



झुआरी सिमेंटचे हेडलबर्ग दीपक कक्कड, संभाजी अरमारचे संस्थापक श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष तथा नूतन नगरसेवक शिवाजी वाघमोडे, नूतन पं.स.सदस्य अंबिकाताई पाटील, शिल्पा बिराजदार, सिध्दाराम चिवडशेट्टी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

रात्री प्रसिद्ध भारुडकार हभप पांडुरंग गवळी (भालेवाडीकर), हभप रघुनाथ बिराजदार (बिदरकर), हभप संभाजी झरे (लातूरकर) यांचा भारुडाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. सोमवारी सकाळी ८ वाजता जाते. जि.प.नूतन सदस्य रामप्पा चिवडशेट्टी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली, त्यानंतर सुनीलसिंह सज्जनसिंह चौहान (नांदेड) यांच्यातर्फे महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी तिल्हेहाळ, औज (आ.), आलेगाव, होटगी स्टेशन, बोरुळ, आहेरवाडी, फताटेवडी, सोलापूर आदी भागातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जीवन ज्योत प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**द. सोलापूर , दि. १६ फेब्रुवारी -**
कंदलगाव येथील जीवन ज्योत प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय मंद्रुप येथे दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पाडला. कार्यक्रम ासाठी प्रमुख वक्ते म्हणून मंद्रुप महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जवाहर मोरे हे होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक पी.एम.कमळे होते.

सहशिक्षक चेतन आवटे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा डॉ. मोरे म्हणाले, दहावीचे वर्ष म्हणजे शिक्षणाचा पाया आहे. हा पाया भक्कम होण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी चांगला नियमित अभ्यास करावा व उत्तीर्ण व्हावे. उत्साही व आनंदी वातावरणात परीक्षेला सामोरे जावे. . प्रास्ताविक सहशिक्षक दिपक कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन समृध्दी कोले हिने केले तर आभार रेणुका बिराजदार हिने मानले.

## घुमंतु विमुक्त समूह संघटनेतर्फे २ मार्चपासून चक्री उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**
कैकाडी समाजास हैदराबाद गॅझेट नुसार एसटी प्रवर्गात महाराष्ट्रात नोंद करावी, सेटलमेंटम धील समाजातील नियोजित गृहनिर्माण संस्थांच्या नावे जमि नीचे वाटप करावे या मागण्यांसाठी घुमंतु विमुक्त जनसमूह संघटनेतर्फे दि. २ मार्चपासून चक्री उपोषण करण्यात येणार आहे, अशी माहिती संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष एस. एल. गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हे आंदोलन सर्टीफाड ग्राऊंड (मड्डी), वांगी रोड, सोलापूर येथे करण्यात येणार आहे. इंग्रजांच्या काळात भटकण्याऱ्या जमातीचा त्रास इंग्रजांना होत होता. काही जमाती क्रांतीकारक उमाजी नाईक, वासुदेव बळवंत फडके यांच्या बरोबर असल्यामुळे इंग्रजांना त्रास देत होत्या. म्हणून १८७१ साली इंग्रजांनी गुन्हेगारी कायदा (क्रमिनल ट्राईबज क्ट) कायदा करुन काही जमातींना सेटलमेंट (गुन्हेगार) जमातीची वसाहतीत बंदीस्त करुन ठेवले. स्वातंत्र्यानंतर आजही या जमाती तंबूमध्ये, झोपड्यात, दगड मातीच्या, पत्र्यांच्या कच्च्या घरात राहत आहेत.सोलापूर सेटलमेंट सर्व्हे नंबर-४२२, ४०६, ४२९ या ठिकाणी बकाल वस्तीत राहणाऱ्या नऊ जमातीच्या लोकांनी नियोजित गृहनिर्माण संस्था करुन जागा नावावर करण्यासाठी प्रयत्न केले, करीत आहेत. परंतु लाल फितीच्या व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जमिनी आमच्या गृहनिर्माण संस्थाच्या नावे झाल्या नाहीत. यासाठी हे उपोषण करण्यात येत आहेत. या पत्रकार परिषदेला डॉ. शिवलाल जाधव, नारायण गायकवाड, बापू नंदूरकर, उर्मिला पवार, ॲड. रेखा माने उपस्थित होते.

### शहरातील महिलांना रोजगार देण्याचा प्रयत्न : कंडूडे

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**
बचत गटातील महिला, सुशिक्षित बेरोजगार युवक यांना विविध संस्थांच्या माध्यमातून रोजगार व उद्योग देण्याचा प्रयत्न राहणार आहे, अशी माहिती भाजपा उद्योग आघाडीच्या प्रदेश सरचिटणीस श्रद्धा कंडूडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. भाग्यविधाता सोशल फाउंडेशन, श्री महालक्ष्मी महिला मंडळ, बिलिटी इंटरप्राईजेस यांच्या मार्फत आर्थिक सक्षमीकरणाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. घरगुती उद्योग , विक्री प्रक्रिया आदी संदर्भात कार्यशाळा व मेळावे घेण्यात येत आहेत. उद्योग निर्मिती करण्यात येणार आहे. महिला आणि युवकांसाठी स्वयंरोजगार कार्यशाळाही आयोजित करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस प्रकाश लोंढे, विनायक चव्हाण, रेखा बिनेकर, विजय नागमोडे, अहमद शेख उपस्थित होते.



## सेवालालनगर येथे सेवालाल जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**द. सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**
बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांची जयंती सेवालाल नगर मंद्रूप येथे साजरी करण्यात आली. आरके फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मोतीलाल राठोड यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. झेंड्याचे पूजन माजी उपसरपंच मोतीराम चव्हाण यांच्या हस्ते करून तांडयातील पंच यांच्या हास्ते भोग लावून जयंती साजरा करण्यात आला.

यावेळी पंचायत समिती सदस्य मळसिद्ध मुगळे व दक्षिण सोलापूर संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष प्रशांत कडते, जयंती उत्सव अध्यक्ष सावन चव्हाण यांच्यासह सुनील राठोड, किरण चव्हाण, विजय राठोड, नामदेव पवार, विठ्ठल पुढारी, राम पवार, पी. आर. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोपीचंद राठोड, श्रीमंत पवार, किरण चव्हाण, बिरापा पुजारी, अविनाश पवार, सचिन चव्हाण, अनिल पवार, विलास चव्हाण, हिरा पवार, प्रेम राठोड, रोहिदास राठोड, नंदकुमार पवार, पोपट पवार, अब्दुल शेख, दादू राठोड, किलील चव्हाण, रवी राठोड, सचिन राठोड, नागेश चव्हाण, श्रीकांत चव्हाण, भगवान चव्हाण, प्रवीण राठोड, अनिल राठोड, मुन्ना राठोड, अतुल पवार, प्रवीण पोमा, मारुती चंदू राठोड यांनी परिश्रम घेतले.

## कवठेकर प्रशालेच्या विद्यार्थ्यांच्या गीततरंगने अभ्यागत मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ फेब्रुवारी-**
पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या कवठेकर प्रशाला,नाथ चौक, पंढरपूरच्या वतीने उमंग सप्ताहाला नुकताच प्रारंभ झाला.कार्यक्रमाचा प्रारंभ सर्व म ान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजनाने झाला. प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही वाय पाटील यांनी स्वागत व प्रस्ताविकात प्रशालेची ही सांस्कृतिक परंपरा असून विदयार्थ्यांना उत्तम संस्कारा व परस्पर सहयोगासाठी उपयोगी असल्याचे नमूद केले.

प्रशालेतील इंग्रजी विभाग प्रमुख एन. जी. कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रम ुख अभ्यागत ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब बडवे, पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नानामालक कवठेकर, सचिव सु.र.पटवर्धन, संस्था सदस्य डॉ. मिलिंद जोशी, एस.पी.कुलकर्णी, संजय कुलकर्णी



व भारत विकास परिषदेचे कार्यवाह शामराव उकिडवे या सर्वांचा सत्कार मुख्याध्यापकांचे हस्ते करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या गीत गायनास प्रारंभ झाला. यामध्ये दहा गाणी एकाचवेळी जवळपास एक हजार ६०० विद्यार्थ्यांनी अत्यंत सुश्राव्यतेने, एक सुर व तालामध्ये, अत्यंत उत्स्फूर्तपणे, तन्मयतेने व उस्फ ूर्तपणे गाऊन सर्व श्रोत्यांची वाहवा मि ळवली. यावेळी प्रशालेचा आसमंत दुम दुमुन गेला होता. सर्व अभ्यागत हे अत्यंत सुश्राव्य ठरलेल्या गायन वर्षामध्ये चिंब न्हाऊन व भारावून गेले होते. कार्यक्रम ाचे प्रमुख अभ्यागत जेष्ठ पत्रकार बडवे यांनी विद्यार्थ्यांवर उत्तमोत्तम संस्कार, ज्ञान व परंपरा जपणारी ही शाळा असल्याचा उल्लेख केला व आशा उपक्रमांची उत्तम राष्ट्र निर्मितीसाठी अत्यंत गरज असल्याचे गौरवोद्गार काढले. संस्था सचिव सु. र. पटवर्धन यांनी या उपक्रमद्वारे एक उत्तम व जबाबदार नागरिक निर्माण करण्यासाठी प्रशाला सदैव प्रयत्नशील राहील असा

## नरखेड येथे महादेव मंदिरात दर्शनासाठी गर्दी

**हर हर महादेव चा' गजर, धार्मिक कार्यक्रम संपन्न**

**तभा वृत्तसेवा,**
**नरखेड, दि.१६ फेब्रुवारी-**
नरखेड (ता. मोहोळ) परिसरातील देगाव ( वा ), डिकसळ, मसले चौधरी, हिंगणी, भोयरे, एकुरके, मलिकवाडी, येलमवाडी, खुनेश्वर, भांबेवाडी, शिरापूर आदी गावांमध्ये महाशिवरात्रीनिमित्त श्री शंभू महादेव मंदिरात शिवभक्ताने शंभू महादेवाच्या दर्शनासाठी मोठी गर्दी करून महाशिवरात्र धार्मिक कार्यक्रमाने साजरी करण्यात आली.

नरखेड (ता.मोहोळ) येथील म हादेव माळ येथील महादेव मंदिरामध्ये महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांनी शंभू म हादेवाच्या दर्शनासाठी रविवारी पहाटेपासूनच गर्दी केल्याने सर्वत्र शिव-पार्वती हर हर म हादेव, चा गजर करण्यात आला. महादेव मंदिरामध्ये पहाटे पाच वाजता महाअभिषेक रुद्राभिषेकानंतर, विधिवत पूजेनंतर नरखेडसह एकुरके, बोपले, येलमवाडी, देगाव, डिकसळ, मलिकपेठ, भोयरे आदी गावच्या भक्तांनी दिवसभर दर्शनासाठी गर्दी केल्यामुळे मंदिरात हर हर महादेव, चा गजर सुरू होता. नरखेड येथील महादेव मंदिराम ध्ये अखंड शिवनाम व हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. मंदिर परिसरात मेवा मिठाई, खेळणी, पाळणे, रसपानगृह, आदी दुकानांची गर्दी होती. शिव मंदिरात येणाऱ्या भाविकांना सकाळ-संध्याकाळ ८ दिवस चहा, पाणी, भोजन तर महाशिवरात्री दिवशी खिचडी, शाबू चिवडा, भगर, शेंगदाण्याचे लाडू, खजूर, दूध, केळी, राजगिऱ्याचे लाडू, फळे, द्राक्ष यासह फराळाचे वाटप दिवसभर चालू होते. सोमवारी सकाळी फुगडी, दिंडीसह काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने म हाशिवरात्रीच्या सप्ताहाची सांगता झाल्याचे हभप रामचंद्र कुदळे, रामचंद्र मोटे, महादेव तागडे, सुनील झुंजार, तुकाराम तागडे, मारुती कुदळे, नामदेव झाडे, नानासाहेब ढवण, सुधाकर पाटील यांनी सांगितले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नगरसेवक इंगळे यांचा पिंगुळी-कुडाळ येथे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१६ फेब्रुवारी-**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पिंगुळी-कुडाळ येथील राऊळ महाराज देवस्थानतर्फे अक्कलकोटचे नगरसेवक व श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे तसेच प्रथमेश इंगळे यांचा सत्कार करण्यात आला.

राऊळ महाराजांचे जीवन संत महात्म्यांच्या दर्जाचे होते असे मत नगरसेवक श्री. इंगळे यांनी व्यक्त केले. देवस्थानतर्फे विश्वस्त विनायक पणशीकर यांनी महेश इंगळे, प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी यांचा राऊळ महाराज यांची दिव्य प्रतिमा,



शाल, श्रीफळ देवून सन्मान केला. यावेळी श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीनेही राऊळ महाराज मंदीर समिती पदाधिकाऱ्यांचा श्री.स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून सत्कार करण्यात आला. यावेळी हडपीड श्री स्वामी समर्थ मठाचे सचिव नंदकुमार पेडणेकर, अध्यक्ष प्रभाकर राणे, कोकण कट्ट्याचे कुमार पितळे, ज्ञानेश्वर भोसले, प्रा.शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, अंकूश केत, मेजर अमोल माने, मनोज इंगुले, सुनिल पवार, नंदकुमार कटारे, रामलिंगय्या स्वामी, डॉ. हिरण्णा पाटील, संतोष पराणे, कुमार हत्तूरे, रमेश शिंदे सर, स्वप्निल गायकवाड, सुरेश वाले, बाबा सुरवसे, संदीप पंडीत, धनराज स्वामी, दर्शन घाटगे, महेश मस्कले, लखन सुरवसे, अरूण शिंदे, बंटी नारायणकर, शंकर मलवे आदींसह अन्य सदस्य व भाविक भक्त उपस्थित होते.



### महत्त्वाचे...



### मलिकपेठ येथे श्री शंभू महादेव पालखी मिरवणूक उत्साहात

**नरखेड, दि.१६ फेब्रुवारी-**

मलिकपेठ (ता.मोहोळ) येथील महाशिवरात्रीनिमित्त यात्रेनिमित्त श्री शंभू महादेवाच्या मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम झाले. हर हर महादेवाच्या जयघोषात मोठ्या उत्साहात पालखीसह मानाच्या काठीची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. येथील श्री शंभू महादेवाच्या मंदीरात शनिवारी चार वाजता सीना व भोगावती नदी संगमावरून मिरवणूकीने कावडीने पाणी आणण्यात आले. तत्पूर्वी संगमावर जलपूजन करण्यात आले. मंदिरामध्ये दैनंदिन नित्यनियमाची शिवलिंग पूजा व आरती झाली. मोहोळ-वैराग रोडवरील मोबाईल टॉवर पासून काठी, पताका, मिरवणुकीसह मंदिरामध्ये आगमन झाले. रविवारी पहाटे पाच ते सहा या वेळेत मानकरांच्या हस्ते शिवलिंगाची व नंदीची विधिवत पूजा झाली. सहा ते सात मूर्तीस व शिवलिंगास दुग्धाभिषेक झाला. रुद्राभिषेक व रुद्र पठण गौरीशंकर स्वामी यांनी केले. सकाळी श्री देवाच्या मूर्ती व पादुका पालखीमध्ये ठेवून पालखीची व शेरणी प्रसाद काठी पताकासह वाजत गाजत गावातील मुख्य रस्त्यावरून नगरप्रदक्षिणेसह टाळ मृदंगाच्या गजरात, बँड, डॉल्बीच्या तालावर मिरवणूक काढली. यामध्ये बाहुल्याच्या सोंगाड्याचा समावेश होता. दुपारी मंदिरामध्ये महाआरती कार्यक्रम शिवभक्त पारायण, शिवयोगी श्री १०८ गुरुदेव शिवाचार्य माडेकर महाराज यांचे शिवप्रवचन, रात्री शिवलीलामृत ग्रंथाचे महादेव मंदिरामध्ये सामूहिक वाचन करण्यात आले. ह.भ.प. कु. पायलीताई कुंजीर (उरळी कांचन) यांच्या काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाने यात्रेची सांगता झाली. यात्रा शांततेत व भक्तीमय वातावरणात पार पाडण्यासाठी ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.



### वैरागच्या महिलांची 'धम्म सहल' उत्साहात; ऐतिहासिक स्थळांना दिली भेट

**वैराग, दि.१६ फेब्रुवारी-**

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती उत्सव समितीच्या वतीने त्यागमुर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेली 'धम्म सहल' उत्साहात पार पडली. या सहलीमध्ये महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, महाड, दापोली आणि अंबाडवे अशा ऐतिहासिक क्रांतीभूमींना अभिवादन करण्यात आले. सहलीची सुरुवात महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे येथे झाली. या ठिकाणी महिलांनी आणि कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जलसत्याग्रहाच्या स्मृतींना उजाळा देत मानवंदना दिली. त्यानंतर सहल दापोली येथे मार्गस्थ झाली, जिथे बाबासाहेबांचे बालपण व्यतीत झाले होते. दापोलीहून माता रमाई यांचे जन्मगाव 'वणंद' येथे जाऊन त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले. सहलीचा मुख्य टप्पा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव 'अंबाडवे'. या ठिकाणी सर्व उपस्थितांनी एकत्रितरित्या त्रिशरण-पंचशील ग्रहण केले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुळ गावी नतमस्तक होऊन सहल पुन्हा वैरागकडे रवाना झाली. या सहलीचे प्रवास उद्घाटन नगरसेवक श्रीशैल भालशंकर यांच्या हस्ते करण्यात झाले. याप्रसंगी समितीचे मार्गदर्शक भारतदादा भालशंकर, अमोल वाघमारे, नानासाहेब क्षीरसागर, सूरज वाघमारे, अरविंद माने आणि विजय वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. धम्म सहल यशस्वी करण्यासाठी मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष विजय वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावती भालशंकर, राजश्री वाघमारे, प्रियांका माने आणि भाग्यश्री वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

# पंढरपुरात कॉरिडॉर विरोधात निदर्शने

### महाशिवरात्रीला सर्व महादेव मंदिरात महाआरती करून घातले साकडे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ फेब्रुवारी -**

पंढरपूर कॉरिडॉर रद्द करावा, या मागणीसाठी रविवारी येथे तीर्थक्षेत्र बचाव समितीच्यावतीने निदर्शन करण्यात आली. 'एकच जिद्द, कॉरिडॉर रद्द' अशा घोषणा देत यापुढील काळात आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी महाशिवरात्रीचे औचित्य साधून सर्व महादेव मंदिरांमध्ये महाआरती करून साकडे घालण्यात आले.

तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे येणाऱ्या लाखो भाविक, वारकऱ्यांना अधिक चांगल्या सोयी-सुविधा देण्यासाठी देशातील अन्य देवस्थानांच्या धर्तीवर 'कॉरिडॉर' करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याअंतर्गत श्री विठ्ठल मंदिर परिसरातील बाधित होत असलेल्या मालमत्ता धारकांची मते जाणून घेण्यात आली. तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सुनावणी झाल्या




असून त्याविषयीचा अहवाल शासनाला पाठविण्यात आला आहे. दरम्यान, अनेक बाधित घटकांनी या कॉरिडॉरला विरोध केलेला आहे. वेळोवेळी, वेगवेगळ्या माध्यमातून आंदोलने करीत त्यांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

महाशिवरात्रीचे औचित्य साधून तीर्थक्षेत्र बचाव समितीच्यावतीने कॉरिडॉर बाधित भागात शिंदे सरकार वाड्याशेजारी असलेल्या श्री सोमेश्वर महादेव मंदिरात तसेच शेजारच्या पूर्वी विस्थापित झालेल्या श्री कोटेश्वर महादेव मंदिरात महाआरती करण्यात आली. त्यानंतर शहरातील अन्यही जुन्या महादेव मंदिरांमध्ये आरती, पूजा करून कॉरिडॉर रद्द होण्यासाठी साकडे घालण्यात आले. घोषणाबाजीसह निदर्शने करण्यात आली.

याप्रसंगी बोलताना नगरसेवक ओंकार जोशी यांनी कॉरिडॉरची आजपर्यंतची सर्व प्रक्रिया बेकायदेशीर असल्याचा आरोप केला.

तीर्थक्षेत्र बचाव समिती व पदाधिकारी हे पंढरपूरला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र बनविण्यासाठी नागरिक व भाविकांच्या नेमक्या गरजा ओळखून, अधिकाधिक चांगल्या सूचना, प्रकल्प सादर करतील, त्याचा शासनाने गांभिर्याने विचार करावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष अभयसिंह इचगांवकर यांनी केले. यावेळी समितीचे उपाध्यक्ष ह.भ.प. माऊली महाराज गुरव, कार्यवाह व्यंकटेश गलगलकर, गणेश लंके, ॲड. विनायक उंडाळ, वैभव बडवे, बालाजी महाजन, यशवंत बेणारे, धनंजय बडवे, बबन भागानगरे, वैष्णवी बडवे आदी उपस्थित होते.

## स्वीकृत सदस्यांना नगर परिषदेत मतदानाचा अधिकार नाही

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ फेब्रुवारी -**

नगर परिषदेमधील स्वीकृत नगरसेवकांच्या आणि जे स्वीकृत सदस्य स्थायी समितीवर निवडले गेले यांच्या अधिकाराबाबत पंढरपूर येथील लोकनियुक्त नगरसेविका माधुरी धोत्रे यांनी पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांना पत्राद्वारे माहिती मागवली होती. यामध्ये स्वीकृत नगरसेवकांची अध्यक्ष वा कोणत्याही समितीचे सभापती म्हणून निवड करता येणार नसून अशा सदस्यांना स्थायी समितीमध्ये वा नगरपरिषदेमध्ये मतदानाचा अधिकार असणार नाही अशी माहिती नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्या परिपत्रकाचा आधार घेऊन माहिती अधिकारात माहिती उघड केल्याने स्वीकृत नगरसेवकांचे अधिकार समोर आले आहेत.

**माहिती अधिकारात झाले उघड**



काही दिवसापूर्वी पंढरपूर नगर परिषदेची पंचवार्षिक निवडणुक प्रक्रिया पार पडली. यामध्ये लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या प्रणिता भालके या नगराध्यक्षपदी विराजमान झाल्या.

मात्र तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे अकरा नगरसेवक निवडून गेले तर पंढरपूर शहर विकास आघाडी व भारतीय जनता पार्टीचे २४ नगरसेवक निवडून आल्याने पालिकेतील संख्याबळ जास्त असल्याने तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा एक आणि भाजपा व शहर विकास आघाडीचे तीन नगरसेवक स्वीकृत सदस्य म्हणून निवडण्यात आले. भाजपा आणि शहर विकास आघाडीकडून दोन स्वीकृत नगरसेवकांना स्थायी समिती सदस्य पदाची संधी देण्यात आली.

नगरपालिकेतील बैठकीदरम्यान नगराध्यक्ष आणि विरोधी गटाच्या नगरसेवकांमध्ये शाब्दिक वादविवाद झाल्याचे माध्यमातून समोर आले होते. दरम्यान स्वीकृत नगरसेवकच हक्क गाजवताना दिसून आल्याने स्वीकृत नगरसेवकांचे अधिकार काय? याबाबत लोकनियुक्त नगरसेवक आणि नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाल्याने नगरसेविका माधुरी धोत्रे यांनी स्वीकृत नगरसेवकांच्या नगरपालिकेतील अधिकाराबाबत मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी पत्राद्वारे माहिती मागवली होती.

यामध्ये स्वीकृत नगरसेवकांना अध्यक्ष व कोणत्याही समितीचे सभापती म्हणून निवड करता येणार नाही. या सदस्यांना स्थायी समितीमध्ये वा नगर परिषदेमध्ये मतदानाचा अधिकार असणार नाही.

अशी माहिती नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई क्र. जिईएन/१०९५/प्र.क्र.५/९५/नवि-३२ दिनांक २० मे १९९५ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाचा आधार घेऊन पंढरपूरच्या मुख्याधिकाऱ्यांनी लेखी स्वरूपात दिल्याने स्वीकृत नगरसेवकांचे अधिकार उघड झाल्याने स्वीकृत नगरसेवकांचे नगरपरिषदेमधील अधिकार समोर आले आहेत.

## वीज समस्यांबाबत आमदार आवताडे यांचे आवाहन

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १६ फेब्रुवारी-**

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना भेडसावत असलेल्या वीज वितरणाशी संबंधित विविध अडी-अडचणींबाबत लेखी स्वरूपात निवेदन सादर करण्याचे आवाहन आमदार समाधान आवताडे यांनी केले आहे. मतदारसंघातील अनेक गावांमध्ये वारंवार वीज खंडित होणे, कमी दाबाचा प्रश्न, जादा बिल आकारणी, नवीन वीज जोडणीस विलंब, ट्रान्सफॉर्मर जळणे, शेतीपंपांना अपुरा पुरवठा, इतर तांत्रिक अडचणी याबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत आहेत.



या सर्व समस्या प्रभावीपणे सोडविण्यासाठी आता लेखी स्वरूपात निवेदन सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित जनसंपर्क कार्यालयात जमा तक्रारींची छाननी करून त्या तत्काळ महावितरण विभागाकडे पाठपुरावा करून निराकरणासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल असे सांगण्यात आले आहे. याबाबतचे निवेदन मंगळवेढा व पंढरपूर येथील जनसंपर्क कार्यालयात देण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांनी निवेदन देताना आपले संपूर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, ग्राहक क्रमांक आणि समस्येचे सविस्तर वर्णन नमूद करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेऊन आपापल्या तक्रारी लेखी स्वरूपात सादर कराव्यात असे आवाहन केले आहे.

## मेडदच्या शितल हांगे यांची कृषी अधिकारीपदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.१६ फेब्रुवारी-**

मेडद (ता. माळशिरस) येथील एका शेतकरी कुटुंबातील कन्येने आपल्या कष्टाच्या जोरावर यशाला गवसणी घातली आहे. शितल बाळकृष्ण हांगे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून तालुका कृषी अधिकारी पदी निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे संपूर्ण तालुक्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



**ग्रामीण भागातून यशाचे शिखर**

शितल यांचे प्राथमिक शिक्षण मेडद येथे झाले. माध्यमिक शिक्षण सातारा येथे यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये झाले. शेतकरी कुटूंबातून असूनही त्यांनी शिक्षणात कधीही खंड पडू दिला नाही. घरची परिस्थिती बेताची असताना आणि शेतीतील कष्टाची जाणीव ठेवून त्यांनी आपले ध्येय निश्चित केले होते. कृषी महाविद्यालय धुळे इथे पदवीचे शि७म झाले. पदव्युत्तर शिक्षण कृषी महाविद्यालय कोल्हापूर इथे पूर्ण केले. पदवी मिळाल्यानंतर त्यांनी एमपीएससीद्वारे घेण्यात येणाऱ्या कृषी सेवा परीक्षेचा अभ्यास सुरू केला आणि घवघवीत यश संपादन केले. शितल यांच्या या यशाबद्दल त्यांचे वडील बाळकृष्ण हांगे व कुटुंबीयांच्या आनंदाला पारावर उरला नव्हता. ग्रामीण भागातील इतर विद्यार्थिनींसाठी त्या एक प्रेरणास्थान ठरल्या आहेत.

**सकारात्मतेचा माझा मानस**

शेतकऱ्याची मुलगी असल्याने शेतीतील समस्यांची मला जवळून जाण आहे. कृषी अधिकारी म्हणून काम करताना शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याचा माझा मानस आहे, अशी प्रतिक्रिया शितल हांगे यांनी दिली.

## हत्तूरमध्ये १५१ नव मतदारांना ओळखपत्रांचे वितरण

### जीवनधारा नागरी पतसंस्थेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

हत्तूर (ता.दक्षिण सोलापूर) येथील १८ वर्षे पूर्ण झालेल्या १५१ तरुण-तरुणींना जीवनधारा पतसंस्था व सिद्धारुढ मल्टि सर्व्हिसेस यांच्यावतीने मतदान प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करून त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली. या नवमतदारांना मतदान ओळखपत्रांचे नुकतेच वितरण करण्यात आले. लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी राबवलेल्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

यावेळी नव मतदारांना मतदान हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आणि कर्तव्य असल्याची जाणीव करून देण्यात आली. स्वच्छ आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रियेचे महत्त्व पटवून सांगण्यात आले. पतसंस्थेचे चेअरमन श्रीकांत भरले यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम घेण्यात आला. फक्त आर्थिक क्षेत्रात नव्हे तर सामाजिक क्षेत्रातही संस्था सक्रिय असल्याचे दिसून आले.

यावेळी प्रशांत सलगरे, रावसाहेब व्हनमाने, सिद्धाराम कानडे, सोमनाथ कोळी, राजशेखर पाटील, कांताप्पा पावटे, तानाजी अवताडे, सुबान अत्तार, बाबुराव चव्हाण, अमजद नदाफ, गणेश काळे, अर्जुन नाईकवाडे, इरेशा सिनेवाडीयार, अस्लम शेख, केदार उपासे, संतोष सीताफळे, विजय सावंत, अंबाजी छपेकर, तफिक बागवान, श्याम कस्तुरे, सोमनाथ वाघमोडे, सोमनिंग व्हनमाने, प्रमोद कुलकर्णी, विठ्ठल कळसुरे, प्रदीप पाटील, आकाश मामदापुरे, आनंद सिताफळे, बनसिध्द पटेवडीयार, इशान अत्तार, महेश डोळळे, चनबसप्पा भरले, रवी हवीनाळे, मलकारी कोरे, बनसिध्द आकळवाडे, सोमनाथ मंगरुळे, बनसिध्द विभुते, आमसिध्द हिरकूर आदी उपस्थित होते. बनसिद्ध वडरे यांनी सूत्रसंचालन केले. महेश आवताडे व मित्रपरिवार यांनी नियोजन पार पाडले.




मतदानाद्वारे योग्य प्रतिनिधी निवडणे हीच खरी देशसेवा आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानप्रक्रीया महत्वाची आहे म्हणून जीवनधारा पतसंस्थेमार्फत १८ वर्षे पूर्ण झालेल्या तरूणांची मतदार यादीत नावनोंदणी करून त्यांना ओळखपत्रही देण्यात आले. मतदारांनी मतदान करून गाव व देशाच्या विकासप्रक्रीयेत सहभागी होणे गरजेचे आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून जीवनधारा पतसंस्थेकडून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**-श्रीकांत भरले, चेअरमन, जीवनधारा पतसंस्था.**

### वेध जिल्हा परिषद स्वीकृत सदस्य निवडीचे

## सुरेश हसापुरे यांची स्वीकृत सदस्यपदी लागणार वर्णी?

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

दक्षिण सोलापूरच्या सहकार क्षेत्रावर वर्चस्व असणारे श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती व सोलापूर जिल्हा दूध संघाचे तज्ञ संचालक सुरेश हसापुरे यांची जिल्हा परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी वर्णी लागणार असल्याची कार्यकर्त्यांमधून जोरदार चर्चा आहे.

हसापूरे यांना संधी मिळाल्यास 'दक्षिण'च्या विकासास हातभार लागणार असून आमदार कल्याणशेट्टी समर्थक हसापुरे यांच्या कार्यकर्त्यांनाही भाजप पक्षवाढीसाठी बळ मिळणार आहे. सुरेश हसापूरे हे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व सोलापूर जिल्हा दूध संघाचे तज्ञ संचालक म्हणून परिचित आहेत. सर्वपक्षीय आमदारांसोबत त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत. २०१२ ते २०१७ या काळात भंडारकवठे जिल्हा परिषद सदस्य असताना त्यांनी कोट्यावधींची विकासकामे केली आहेत. या निवडणूकीत ६० पेक्षा अधिक सदस्य नवीन असल्यामुळे हसापूरे यांच्यासारखा अनुभवी व तज्ञ सदस्य जिल्हा परिषद सभागृहात मार्गदर्शक म्हणून असणे गरजेचे आहे. शिवाय राजकारणापेक्षा विकासकामांना प्राधान्य देण्याची कसब त्यांच्याकडे असल्याने त्याचाही फायदा नवीन



सदस्यांना होऊ शकते. म्हणून त्यांच्या नावाची चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात येते. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत हसापुरे यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती. २०१७ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कुंभारी येथील जिल्हा परिषद गटातून त्यांचा पराभव झाला. त्यानंतर नऊ वर्षे त्यांनी निवडणूक लढविले नाही. गेल्या नऊ वर्षात कोणतेही पद नसताना त्यांनी दक्षिण तालुक्यात काँग्रेस व भाजपच्या लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करून व निधी मिळवून कोट्यावधींची विकास कामे केली आहेत. त्यामुळे दक्षिणमध्ये सर्वच गावांमध्ये हसापूरे यांचे कार्यकर्ते सक्रीय आहेत. मात्र नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यांना हत्तूर पंचायत समिती गणातून भाजपकडून उमेदवारी देण्यात आली होती. मात्र दोन आमदारांमधील संघर्षामुळे ऐनवेळी उमेदवारी रद्द करण्यात आली. त्यामुळे दक्षिण तालुक्याच्या विकासासाठी काम करण्याची संधी मिळावी म्हणून सुरेश हसापूरे यांना जिल्हा परिषद सदस्य म्हणून घेण्याची मागणी कार्यकर्त्यांकडून होत आहे.

सुरेश हसापूरे यांचे पालकमंत्री जयकुमार गोरे व अक्कलकोटचे आमदार कल्याणशेट्टी यांच्याबरोबर घनिष्ठ संबंध असल्यामुळे हसापूरे यांच्या कार्यकर्त्यांकडून मागणी करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेमध्ये सचिन कल्याणशेट्टी हे पक्षश्रेष्ठी असल्यामुळे हसापुरे यांना आमदार कल्याणशेट्टी स्वीकृत सदस्य म्हणून संधी देतील अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. हसापूरे यांना स्वीकृत सदस्यपदी संधी मिळाल्यास विकासासाठी हातभार लागणार आहे. म्हणून हसापूरेंच्या स्वीकृत सदस्य निवडीची मागणी करण्यात जोर धरत आहे.

**सुरेश हसापूरे यांना दक्षिण तालुक्यात मानणारा कार्यकर्त्यांचा गट आहे. शिवाय सहकार क्षेत्रावरही त्यांचे वर्चस्व आहे. भाजपच्या सर्व आमदारांशी घनिष्ठ संबंध आहे. श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समीतीच्या निवडणुकीत आमदार कल्याणशेट्टी यांचे पॅनल निवडून आणण्यात हसापूरे यांचा मोलाचा वाटा आहे. म्हणून त्यांना स्वीकृत सदस्यपदी संधी देण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.**